# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३/विवि/**१३**/२०२३
दिनांक : १९.०१.२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : महाविद्यालयातील भुगोल आणि अभियांत्रिकी विषयाच्या विद्यार्थ्यांनी लेफ्टनंट कर्नल विलीयम लॅम्पटन यांच्या स्मारक स्थळाला (हिंगणघाट) येथे भेट देण्याबाबत.**

संदर्भ : मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट, जि.वर्धा यांचे पत्र क्र.नपाहिं/बां,वि/कावि- ३३४/२०२२ दिनांक २८.१२.२०२२

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट, जि.वर्धा यांचे प्राप्त पत्रानुसार ले.कर्नल विलीयम लॅम्पटन यांचे मृत्युला २० जानेवारी, २०२३ ला २०० वर्ष पुर्ण होत असल्यामुळे त्यांचा २० जानेवारी, २०२३ ला द्विशताब्दी स्मृतीदिन साजरा करण्यात येणार असून या कार्यक्रमाकरीता आपल्या महाविद्यालयातील भुगोल व अभियांत्रिकी विषयाचे विद्यार्थ्यांनी ले.कर्नल विलीयम लॅम्पटन यांच्या स्मारक स्थळाला हिंगणघाट येथे भेट द्यावी अशी आयोजकांनी विनंती केलेली आहे.

याबाबत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी ले.कर्नल विलीयम लॅम्पटन स्मारक स्थळ हिंगणघाट येथे भेट आयोजित करावी अथवा भेट देण्याबाबत कृपया सूचित करावे, ही विनंती. तसेच सोबतचे परिपत्रक अवलोकावे व त्याअनुषंगाने आपण आपले स्तरावर कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र :** मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट, जि.वर्धा यांचे पत्र क्र.नपाहिं/बां,वि/कावि- ३३४/२०२२ दिनांक २८.१२.२०२२

**प्रतिलिपी :**
१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
२. प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

# नगर परिषद हिंगणघाट
(जिल्हा वर्धा)

Email-Id-hinganghatmc@gmail.com
Fax no / phone No-07153-245977

पत्र क्र. नपाहिं / बां.वि / कावि– 334 / 22
दिनांक :– 28/12/2022

329
29/12/22

प्रति,

मा. कुलगुरू,
संत गाडगेबाबा,
अमरावती विद्यापिठ, अमरावती

**विषय :– संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापिठ, अमरावती संलग्नीत विद्यालयातील भुगोल आणि अभियांत्रीकी विषयाच्या विद्यार्थ्यांनी लेफ्टनंट कर्नल विलीयम लॅम्पटन यांच्या स्मारक स्थळाला (हिंगणघाट) भेट देण्याबाबत.**

संदर्भ :– अध्यक्ष, लेफ्टनंट कर्नल विलीयम लॅम्पटन द्विशताब्दी समारोह आयोजन समिती, हिंगणघाट यांचे पत्र दिनांक 12.12.2022

महोदय,

उपरोक्त संदर्भित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ले. कर्नल विलीयम लॅम्पटन यांनी 1802 साली मद्रास पासून भारताच्या त्रिकोणमीतीय सर्वेक्षणाला सुरूवात केली. द ग्रेट इंडियन ट्रिग्नोमेट्रीकल सर्वे हे जगातील सर्वात मोठे सर्वेक्षण होते. हे सर्वेक्षण 1872 पर्यंत सुरू होते. या सर्वेक्षणातून भारताचा नकाशा तयार झाला. याच सर्वेक्षणाने नागपूर मधील 0 मैल नागपूरला दिले. या सर्वेक्षणाने भुभौतीकी या विषयातील समस्थायीत वाचा सिध्दांत जगाला दिला आणि याच सर्वेक्षणाच्या निमीत्याने रॉबर्ट रॉस यांनी भारतातच मलेरीयाचे जंतू शोधून काढले होते. याच सर्वेक्षणातून पृथ्वीचा नेमका आकार कसा आहे हे सुध्दा सिध्द केले होते. इतके मोठे महत्व ले. कर्नल विलीयम लॅम्पटन यांच्या त्रिमीतीय सर्वेक्षणाचे आहे.

856
09/1/23

ले. कर्नल विलीयम लॅम्पटन यांचे सर्वेक्षणाचे काम दिनांक 10 एप्रिल 1802 मध्ये सुरू झाले. 10 एप्रिल हा दिवस भारतात राष्ट्रीय भुमापन दिन म्हणून साजरा करतात. ले. कर्नल विलीयम लॅम्पटन यांचे सर्वेक्षणाचे कार्य सुरू असतांना दिनांक 20 जानेवारी 1823 ला वयाच्या 70 व्या वर्षी त्यांचे हिंगणघाट जि. वर्धा येथे निधन झाले. हिंगणघाट येथे त्यांची समाधी स्थित आहे. त्यांच्या मृत्यूला 20 जानेवारी 2023 ला 200 वर्ष पुर्ण होत आहे. त्यामुळे आयोजन समिती तर्फे त्यांचा 20 जानेवारी 2023 ला **द्विशताब्दी स्मृतीदिन** साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमा करीता आपल्या विद्यापिठातील भुगोल आणि अभियांत्रीकी विद्यार्थ्यांनी स्मारक स्थळाला भेट दयावी अशी आयोजकांची विनंती आहे.

करीता आपल्या विद्यापिठातील भुगोल आणि अभियांत्रीकी विद्यार्थ्यांना स्मारक स्थळाला दिनांक 20 जानेवारी 2023 ला हिंगणघाट ले. कर्नल विलीयम लॅम्पटन यांचे समाधी स्थळाला (स्मारक) भेट देण्याबाबत उपकृत करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(हर्षल गायकवाड)
मुख्याधिकारी
निवड–श्रेणी
नगर परिषद, हिंगणघाट

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Inward No. 1109
Date 31 DEC 2022
To whom Marked
Section

नगर पालिका हिंगणघाट

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
Registrar's Office
Inward No. 12
Date 05 JAN 2023
To Whom Marked

संचालक, विद्यार्थी विकास
05/01/23